**ठळक बातम्या**

- गेल्या अकरा वर्षांत केंद्र सरकारनं लोककेंद्री आणि सर्वांगीण प्रगतीला प्राधान्य दिल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- ठाण्याजवळ लोकलमधून पडल्यानं ४ जणांचा मृत्यू, ९ जखमी ; राज्य सरकारकडून आर्थिक मदत जाहीर

- प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्तींवरची बंदी मुंबई उच्च न्यायालयानं उठवली

**आणि**

- यंदाचा राजर्षी शाहू पुरस्कार ज्येष्ठ दिग्दर्शक जब्बार पटेल यांना जाहीर

**<><><><>**

गेल्या ११ वर्षांत १४० कोटी भारतीयांच्या सामूहिक सहभागामुळे देशानं विविध क्षेत्रांमध्ये परिवर्तन घडवून आणलं आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. गेल्या अकरा वर्षांत सरकारनं लोककेंद्री आणि सर्वांगीण प्रगतीला प्राधान्य दिल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आपल्या संदेशात म्हटलं आहेत.

गेल्या अकरा वर्षातल्या देशाच्या प्रगतीबाबत नमो ऍपवर घेण्यात येणाऱ्या सर्वेक्षणात सर्वांनी सहभाग नोंदवावा, असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. प्रधानमंत्र्यांनी आपल्या समाजमाध्यम खात्यावर या जन मन सर्वेक्षणाची लिंक शेअर केली आहे.

**<><><><>**

गेल्या ११ वर्षांच्या काळात प्रधानमंत्री मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारमुळे देशानं आर्थिक पुनरुज्जीवन, सामाजिक न्याय, सांस्कृतिकतेचा अभिमान आणि राष्ट्रीय सुरक्षेचं एक नवं पर्व पाहिलं, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात शहा म्हणाले की, ही ऐतिहासिक ११ वर्षं संकल्प, समर्पण, आणि सार्वजनिक सेवेसाठी सुवर्णकाळ ठरली आहेत. जेव्हा नेतृत्व स्पष्ट, दृढनिश्चयी आणि

सार्वजनिक सेवेवर केंद्रित असतं, तेव्हा सेवा, सुरक्षा आणि सुशासन यांचे नवे टप्पे गाठले जातात, असं म्हटलं आहे.

**<><><><>**

ठाण्याजवळ मध्य रेल्वेच्या दिवा आणि मुंब्रा स्थानकादरम्यान कसाऱ्याहून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसकडे जाणाऱ्या उपनगरी रेल्वेगाडीतून पडून आज चार प्रवाशांचा मृत्यू झाला तर नऊ जण जखमी झाले. ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केलेल्या तीन जखमींचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याची माहिती ठाणे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कैलास पवार यांनी दिली. तर कळव्याच्या रुग्णालयानं दिलेल्या माहितीनुसार एका जखमीचा रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच मृत्यू झाला होता. इतरांवर रुग्णालयांमध्ये उपचार सुरू आहेत.

मृत आणि जखमींना राज्य सरकारनं आर्थिक मदत जाहीर केल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी जखमींची पाहणी केल्यावर दिली.

- **- होल्ड - गिरीश महाजन - -**

कसाऱ्याकडे जाणाऱ्या गाडीतून दारात लटकून जाणारे प्रवासी मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या गाडीच्या दरवाजात लटकलेल्या प्रवाशांना धडकल्यानं हा अपघात झाला, अशी माहिती मध्य रेल्वेनं दिली आहे. भविष्यात असे अपघात होऊ नयेत, याकरता सर्व गाड्या १५ डब्यांच्या करणं, स्वयंचलित दरवाजे बसवणं असे निर्णय रेल्वे बोर्डानं यापूर्वीच घेतल्याची माहिती मध्य रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी स्वप्निल नीला यांनी दिली.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी या दुर्घटनेबद्दल दु:ख व्यक्त केला आहे. दिवा ते सीएसएमटी दरम्यान लोकल सुरू करण्याची मागणी खासदार श्रीकांत शिंदे यांनी केली आहे.

**<><><><>**

ऊसाच्या पिकाच्या उत्पादनाकरता कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरासाठी शेतकऱ्यांना हेक्टरी २५ हजार रुपये कर्ज देण्यात येईल अशी घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज केली. पुण्यातल्या वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट इथं ऊस उत्पादन वाढीसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर, या विषयावर आयोजित चर्चासत्रात अजित पवार बोलत होते. ऊस पिकाच्या कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी हेक्टरी २५ हजार रुपये देणार असून हे पीक ठिबक

सिंचनावर घेण्यात येत असेल तर त्यासाठी हेक्टरी १० हजार रुपये बिनव्याजी कर्ज देणार असल्याचं अजित पवार यांनी सांगितलं.

<><><><>

यंदाच्या आषाढी वारीच्या पालखी सोहळ्यासाठी ग्रामविकास विभागानं ६० कोटी रुपयांची तरतूद केली असल्याचं ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितलं. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्याच्या तयारीचा आढावा आज गोरे यांनी घेतला. पावसाचं प्रमाण अधिक असल्यानं पालखी मार्गावर ठिकठिकाणी निवारा शेड उभारल्या जातील, असं ते म्हणाले.

<><><><>

प्लास्टर ऑफ पॅरिसने बनवलेल्या गणेशमूर्तींवरची बंदी मुंबई उच्च न्यायालयाने उठवली आहे. मात्र या मूर्तींचं विसर्जन नैसर्गिक जलस्रोतात करता येणार नाही, असं स्पष्ट केलं आहे. पीओपी गणेशमूर्तींच्या विक्रीवरची बंदी हटवण्याची मागणी करणारी याचिका मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठासमोर दाखल झाली होती. पीओपी गणेशमूर्तींचं विसर्जन केवळ कृत्रिम तलावातच करण्याबाबत याचिकाकर्ते आणि प्रतिवादी दोन्ही पक्षांची सहमती झाली. प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या तज्ञ समितीने केलेल्या शिफारशींच्या आधारे या मूर्तींच्या विसर्जनाची व्यवस्था करावी, तसंच तीन आठवड्यांच्या आत त्याचा अहवाल सादर करावा, असंही न्यायालयानं सांगितलं.

<><><><>

राजर्षी छत्रपती शाहू स्मारक न्यासाच्या वतीनं दिला जाणारा शाहू पुरस्कार ज्येष्ठ दिग्दर्शक जब्बार पटेल यांना जाहीर झाला आहे. पुरस्काराचं हे ३९ वं वर्ष आहे. कोल्हापुरचे जिल्हाधिकारी अमोल येडगे यानी आज कोल्हापूर इथं वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीदिनी हा पुरस्कार प्रदान केला जाईल. १ लाख रुपये, स्मृतिचिन्ह आणि मानपत्र असं या पुरस्काराचं स्वरुप आहे.

<><><><>

छत्रपती शिवाजी महाराजांचा तिथीनुसार ३५२ वा शिवराज्याभिषेक सोहळा आज दुर्गराज रायगडावर साजरा झाला. महाराजांच्या गडकिल्ल्यांचं संवर्धन आणि जतन

होण्यासोबतच गड किल्ले अतिक्रमण मुक्त झाले पाहिजेत, असं मत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केलं.

रायगडावरील राज सदरेवर मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते शिवप्रतिमेचं पूजन करण्यात आलं, त्यानंतरच्या कार्यक्रमात शिंदे बोलत होते. रायगडाच्या पायथ्याशी उभारण्यात येत असलेल्या शिवसृष्टीला निधी कमी पडू दिला जाणार नाही, असंही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितलं.

**<><><><>**

नाशिक मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठीच्या प्राधिकरणाची अधिसूचना आज प्रकाशित झाली. २१ सदस्यीय प्राधिकरणात नाशिकचे विभागीय आयुक्त हे अध्यक्ष तर जिल्हाधिकारी आणि नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक हे उपाध्यक्ष असतील.

**<><><><>**

शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग आणि नवनवीन प्रयोग करून कमी खर्चात अधिक उत्पन्न मिळवण्याच्या दृष्टिकोनातून कृषी विज्ञान केंद्रांच्या संशोधकांचं मार्गदर्शन घ्यावं असं आवाहन केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी केलं आहे. केंद्र सरकारच्या कृषी संकल्प अभियानाअंतर्गत आज बुलढाणा जिल्ह्यात केळवद इथं झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.

**<><><><>**

विकसित कृषी संकल्प अभियानाअंतर्गत सांगली जिल्ह्यात कवठे महांकाळ तालुक्यातल्या कुची गावात आज कार्यशाळा झाली. बदलत्या हवामानाशी जुळवून घेण्याकरता आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरानं करण्याच्या उपायांबद्दल यावेळी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आलं. कृषी विज्ञान केंद्रातून मिळालेल्या मार्गदर्शनाविषयी शेतकरी मोहन पाटील यांनी सांगितलं.

**- होल्ड - सांगली बाइट - -**

**<><><><>**

अहिल्यानगर मध्ये आज एक चारचाकी आणि ट्रक यांची धडक होऊन झालेल्या अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला तर ११ जण जखमी झाले. जखमींवर अहमदनगर इथल्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
९ जून २०२५ - सोमवार

**<><><><>**

बुलडाणा जिल्ह्यातल्या खामगाव इथं मध्यरात्री खासगी बस आणि ट्रकच्या अपघातात ट्रकचालकाचा मृत्यू झाला असून तीन जण गंभीर जखमी झाले आहेत.

**<><><><>**

बुलडाणा जिल्ह्यातल्या खामगाव शहरात पोलिसांनी ६२ पोते गुटखा जप्त केला आहे. या प्रकरणी वाहनाचा चालक आणि एका व्यक्तीला अटक करण्यात आली आहे.

**<><><><>**

मुंबई महानगरपालिकेनं या वर्षी पहिल्यांदाच वाहनांवर वसवलेले १० फिरते उदंचन संच तयार ठेवले आहेत. सखल भागात साचणाऱ्या पाण्याचा निचरा लवकर व्हावा, यासाठी महानगरपालिकेनं बसवलेले उदंचन पंप  विविध कारणांमुळे कार्यान्वित झाले नाहीत तर सखल भागामध्ये पाणी साचून राहतं. या समस्येवर मात करण्यासाठी ही उपाययोजना केली आहे.

**<><><><>**

येत्या २ दिवसात राज्यात सर्वत्र तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

**//<><><><>//**